महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०० वे | दिनांक : ०४/०४/२०२६ | वार : शनिवार

## 'मनाचे श्लोक'चा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर परिणाम दिसतो - किशोरी पेडणेकर यांचे वक्तव्य



**मुंबई :** समर्थ रामदास स्वामी यांच्या 'मनाचे श्लोक'चा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर परिणाम दिसतो, असे वादग्रस्त वक्तव्य उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती.

पेडणेकर यांनी या प्रकरणावर लगेच सारवासारव केली. तसेच आपल्या वक्तव्याने कुणाची मने दुखली असतील, तर माफी मागते, असे सांगितले.

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांवर संस्कार व्हावेत, या उद्देशाने आता समर्थ रामदास स्वामी रचित 'मनाचे श्लोक' सक्तीचे करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. माजी महापौर आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी हा प्रस्ताव दिला आहे. हा प्रस्ताव समोर येताच एमआयएम पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

एमआयएमचे गटनेते विजय उबाळे यांनी यावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. उबाळे यांनी आपली भूमिका मांडताना म्हटले की, शाळा हे शिक्षणाचे मंदिर आहे, तिथे कोणत्याही विशिष्ट धर्माच्या शिकवणीची सक्ती करणे चुकीचे आहे. शाळांमध्ये धर्माधारित शिक्षण देण्याऐवजी विद्यार्थ्यांना संविधानाचे मूल्य आणि त्यातील कर्तव्यांचे शिक्षण द्यायला हवे. एमआयएमने विरोध केल्यानंतर किशोरी पेडणेकर यांनी एकदम माघार घेतली आहे.

एमआयएमने विरोध केल्यानंतर बोलताना किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, मनाचे श्लोकाला कुणीतरी विरोध केला असे मला समजले. त्याला विरोध करण्याची काहीच गरज नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लहानपण जर आपण पाहिले त्यांच्या मनावर मनाच्या श्लोकांचा परिणाम दिसतो. मनाचे श्लोक हे समर्थ रामदास स्वामी यांनी लिहले आहेत. मनपाच्या अनेक शाळा आहेत, त्यांचे लाखात विद्यार्थी आहेत जर असे असतील तर त्यांच्या मनावरती खऱ्या अर्थाने सर्व जाती-धर्म पंथाच्या लहान मुलांवर संस्कार व्हावे म्हणून मनाचे श्लोक फक्त हिंदूचे आहेत असे म्हणू नये.

किशोरी पेडणेकर यांच्या या वक्तव्यानंतर टीकेची एकच झोड उठली. विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर किशोरी पेडणेकर यांनी दिलगिरी व्यक्त केली. त्या म्हणाल्या की, 'मी अशी जोडणी पुन्हा करणार नाही. त्या माध्यमातून कुणाचे मन दुखावले गेले असेल तर मी माफी मागते. पण माझा उद्देश होता. कोणत्याही जाती पंथाचा नागरिक चांगला घडावा आणि आपल्या देशाच्या संविधानाचे कर्तव्य आणि अधिकार त्याला कळेल असे म्हणायचे होते. पण यापुढे अशी जोडणी होणार नाही.'

समर्थ रामदास स्वामी यांनी यांनी मनाचे श्लोक लिहिले आहे. या पद्यातील श्लोकांची संख्या २०५ आहे. त्यांची रजना भुजंगप्रयात वृत्तात केली असून, प्रत्येक ओळीमध्ये १२ अक्षरे आहेत. हे श्लोक सकाळच्या तसेच सायंकाळच्या प्रार्थनेत म्हणले जातात. भोजनाच्या प्रारंभी आणि संप्रदायातील शिष्य हे भिक्षा मागतानाही हे श्लोक म्हणतात. संस्कार व सुविचार यांचा उत्तम मेळ या श्लोक झालेला दिसतो. श्लोकातून समर्थ रामदास स्वामींनी सदाचाराची शिकवण दिली आहे. ईश्वरभक्ती, नैतिकता, जीवनदर्शन, मनशांती असे अनेक विषयांवर त्यांनी या श्लोकातून अतिशय मौलिक मार्गदर्शन केले आहे.

## बारामतीत काँग्रेसने मोठेपणा दाखवावा - चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन



**मुंबई :** अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच महायुतीच्या वतीने सुनेत्रा पवार या उमेदवार असणार आहेत. त्यांच्या विरोधात उमेदवार देण्याचा प्रश्नच येत नसल्याचे सुप्रिया सुळे यांनी जाहिर केले आहे. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे. या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसच्या नेत्यांना उमेदवार न देण्याची विनंती केली आहे.

या संदर्भात माध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसच्या नेत्यांना अजित दादा यांचा दीर्घ काळ सहवास लाभला आहे. काँग्रेस असो की, कोणत्याही पक्षाचा माणूस त्यांच्याकडे गेला तरी अजित पवार त्याचं काम करत होते. त्या अजित पवारांचीच ही सीट आहे. काँग्रेस सोबत अजित पवार यांचा अनेक वर्षांचा सहवास राहिला आहे. आयुष्यातील ७५ टक्के राजकारण अजित पवार यांनी काँग्रेसच्या नेत्यांच्या सहवासात घालवले आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांना माझी मागणी आहे की, त्यांनी ही सीट बिनविरोध करावे. राहुरी मध्ये त्यांची लढण्याची इच्छा असेल, तर त्यांनी लढावे. त्यांचा तो अधिकार आहे. त्या ठिकाणी आम्हीही लढायला तयार आहोत. मात्र, बारामती मध्ये आमच्या वहिनी सुनेत्रा पवार यांची निवडणूक आहे. ती सर्वांनीच बिनविरोध करावी, अशी आमची मागणी असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी यांचा देखील काँग्रेसला बारामतीमध्ये पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या पक्षाच्या नेत्यांना देखील आम्ही हीच विनंती करत आहे. अजित पवार यांचा या सर्वांनाही सहवास राहिला आहे. अजित पवारांची आठवण अजूनही आपल्या सोबत आहेत. त्यांना जाऊन अजून वर्ष देखील झाले नाही. त्यामुळे किमान या निवडणुकीच्या माध्यमातून तरी काँग्रेसने आपले मोठे मन दाखववे, असे आवाहन बावनकुळे यांनी केले आहे.

राष्ट्रवादीच्या दोन्ही पक्षाच्या विलिनीकरण संदर्भातला निर्णय हा सुनेत्रा पवार यांचाच असेल. त्या त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आहेत. त्यामुळे विलिनीकरण संदर्भातला त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम असेल. त्यामुळे या संदर्भात काही बोलण्यास बावनकुळे यांनी नकार दिला आहे.

## बच्चू कडू यांच्यावर हत्येचा कट रचल्याचा गंभीर आरोप : आमदार प्रवीण तायडेंच्या भावाला संपवण्याचे कारस्थान



**अमरावती :** राजकीय वैमनस्यातून आपल्याला अपघातात ठार मारण्याचा कट रचल्याची तक्रार भाजप आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजीत तायडे यांनी केली असून, याप्रकरणी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासह तिघांविरुद्ध अमरावती ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विधानसभा निवडणुकीत प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांचा पराभव केल्याच्या रागातून हा कट आखल्याचा गंभीर आरोप तायडे यांनी आपल्या तक्रारीत केला असून, या घटनेमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांना राजकीयदृष्ट्या कमकुवत करण्यासाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी त्यांच्या चुलत बंधूंना, म्हणजेच अभिजीत तायडे यांना अपघाताचा बनाव करून जीवे मारण्याचा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मतदारसंघात जनसंपर्क वाढवण्यासाठी सक्रिय असलेल्या ४० वर्षीय अभिजीत तायडे यांनी यासंदर्भात लेखी तक्रार दिली असून, राजकीय वैमनस्यातून आपल्याला संपवण्याचा हा प्रयत्न असल्याचा दावा तायडे बंधूंनी या तक्रारीत केला आहे.

तक्रारीनुसार, गेल्या डिसेंबर महिन्यात बच्चू कडू यांच्या कुरळपूर्णा येथील निवासस्थानी झालेल्या एका बैठकीत बच्चू कडू, शुभम ऊर्फ गोलू माहोरे आणि इतरांनी मिळून अभिजीत तायडे यांना अपघातात ठार मारण्याचा कट रचला होता. एका गोपनीय साक्षीदाराने या संवादाचे रेकॉर्डिंग केले असून, त्या संभाषणाचा पुरावा असलेला पेन ड्राईव्ह तक्रारदाराने पोलिसांकडे सोपवला आहे. तसेच आमदार प्रवीण तायडे विधिमंडळाच्या अधिवेशनात व्यस्त असल्यामुळे ही तक्रार नोंदवण्यास विलंब झाल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले आहे.

प्राप्त तक्रार आणि पेन ड्राईव्हमधील प्राथमिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, बच्चू कडू, शुभम ऊर्फ गोलू माहोरे आणि एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ५५, ५८ आणि ६१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी जप्त केलेली ऑडिओ क्लिप आणि त्यातील संभाषणाची सत्यता पडताळण्यासाठी ती न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठवण्यात येणार असून, त्याद्वारे तांत्रिक पुराव्यांची खातरजमा केली जाणार आहे.

या संवेदनशील प्रकरणामुळे जिल्ह्यात तणाव निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला असून, सध्या चांदूर बाजार पोलिस या संपूर्ण प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत.

गुन्हा दाखल झाल्यानंतर बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, कट रचणे हा आमचा धंदा नाही, आम्ही रक्तदान करणारे लोक आहोत, रक्त देणारे लोक आहोत. कोणाचा जीव घेणारे लोक नाही. मला बदनाम करण्यासाठी हा कट रचला गेला आहे. शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर दीड लाख रुपये मिळावे यासाठी आता मी आंदोलन करणार होतो. कार्यकर्त्यांचं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न आहे.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, अशा पद्धतीने जर आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असेल तर आम्ही स्वतःहून अटक होऊ, प्रभू रामचंद्राच्या राम मंदिरातून आम्ही अटक करून घेऊ. मी उद्यापासून एव्हरेस्ट बेस कॅम्पला चाललो आहे. देवाचीच अकृपा झाली तर आम्ही काय करणार? सत्ता तुमची, एसपी तुमचा, फॉरेन्सिक लॅब तुमची. कट रचणे हा आमचा धंदा नाही, असे कडू यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ एप्रिल २०२६


## लोणचं

आंब्याचं लोणचं
चवीला चटकदार
लहान मोठ्यांना
आवडते फार

लिंबाचं लोणचं
आंबट गोड
जेवणात असावी
एक तरी फोड

मिरचीचं लोणचं
डोळ्यात आणतं पूर
त्यांच्यापासून आम्ही
चार हात दूर

आवळ्याचं लोणचं
मुलांना आरोग्यदायी
रोज रोज ताटात
वाढते आई

प्रत्येक लोणचं
चवीला जबरदस्त
ताटात असल्यावर
जेवण होते मस्त



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## जांबाचा बाग तोडताना

उरावर आलेल्या धरणाची
भिंत बांधल्या गेली पूर्ण
अन् अटळ झालं मरण
जांबाच्या हिरव्यागार बागाबरोबर
बाग लावणाऱ्या बापाचं..
आमच्या मळ्याचं
अन् आजूबाजूच्या शिवाराचं.

बापानं जपली होती लेकरापरीस
जांबाची बाग काळजात
अन् लावला होता जीव
जांबाबरोबर बोरी बाभळी लिंब
अन् आंब्याच्या झाडावर..

आता झाडं लावलेले हात
तोडू लागले एक एक झाड
अंगात त्राण नसतानाही
आपल्या पायावर कुऱ्हाड घातल्यागत..

तेव्हा बापाबरोबर रडत होती
मळ्यातली तुटलेली अन् तुटणारी झाडं
जगाचं पोट भरवणारी मायाळू माती
अन् झाडावरची रानपाखरं..

तेव्हा आलं होतं अंधारून आभाळ
अन् रडत होता रानवारा आतल्याआत..
दुरवर उभी राहून
भरल्या डोळ्यांनी पाहत होती रानतुळस
त्या उदास खारूताईला
अन् पाखरांच्या मोडलेल्या खोप्याला..

धरण भरलं त्या रात्री
झोपलाच नाही बाप
आपला जांबाचा मळा..
आपला जांबाचा मळा म्हणत
फिरत राहिला पुढं
निर्वासित होऊन रानोमाळ
जीवात जीव असेपर्यंत..

ज्ञानेश्वर गायके, कन्नड

# अंबाला येथे पाटणादेवी चंडिका माता व हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** भारतातील सर्वात प्राचीन लेणी पितळखोरा येथे वसलेलं एक छोटसं आदिवासी ठाकर समाजाचा गाव म्हणजेच अंबाला या गावापासून साधारणता दोन किलोमीटर अंतरावर पितळखोरा लेणी आहे पितळखोरा लेणी ही अजिंठा लेणी पेक्षाही जुनी आहे याच लेण्यांच्या सह्याद्रीच्या पायथ्याशी गौताळा अभयारण्याच्या घनदाट जंगलात वसलेले एक प्राचीन आणि जागृत आदिशक्ती चंडिका देवीचे मंदिर आहे हे बाराव्या शतकातील हेमाडपंती मंदिर असून वणीच्या सप्तशृंगी देवीचे बहीण मानली जाते त्याचबरोबर आंबाला गावातील वडिलोपार्जित परंपरा आजही या गावात पाहायला मिळत आहे सन १९७४ मध्ये देवीची साथ,२००३ मध्ये डेंगी, या आजाराचा प्रादुर्भाव महाराष्ट्रातही झाला होता त्यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिकांनी चंडिका मातेला पाटणा गावात जाऊन साकडे,नवस घातले होते की आमच्या गावात रोग आजार येऊ देऊ नकोस आमच्या परिवाराला, लेकरांना, जनावरांना सुखी ठेव आम्ही तुला आमच्या गावची कुलदैवत म्हणून आमच्या गावात स्थापना करून पूजा भंडारा व काठी काढून तुझी मिरवणूक काढू असे गावातील ज्येष्ठ नागरिकांनी साकडे घातले होते त्याचबरोबर गावाच्या जवळील श्री हनुमान, (बजरंगबली) ला सुद्धा साकडे घातले होते देवीची साथ या रोगाने महाराष्ट्र भर हाहाकार माजवला होता तरी सुद्धा या गावात एकही व्यक्ती या आजाराचा रुग्ण झाला नाही त्यावेळेस हा आजार रोग पूर्णपणे बरा होऊन गेला होता पण तरीही या गावावर कोणतेही संकट आले नव्हते रोगाचा प्रादुर्भाव झाला नव्हता तेव्हापासून आदिवासी ठाकर समाजाचा चंडिका मातेवर विश्वास बसला तेव्हापासून हनुमानावर आणी चंडिका मातेवर विश्वास ठेवत होते आणि आजही ठेवत आहे. या गावात सकाळी ७ ते १ च्या दरम्यान हनुमान यांची पूजा करतात व नंतर काठीची मिरवणूक काढतात एक ते दोन च्या दरम्यान चंडिका मातेची पूजा करतात नंतर पुर्ण गावाला महाप्रसाद दिला जातो काठीची मिरवणूक काढण्याचा उद्देश असा की, गावावर कुठल्याही प्रकारचे संकट येऊ नये जसे चिकुनगुणिया, कोरोना सारखे आजार यागावातील लोकांवर येऊ नये म्हणून हा काठीचा कार्यक्रम वडिलोपार्जित दरवर्षी घेण्यात येतो असे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती गंगाराम आगिवले सखाराम भुतांबरे शिवराम मेंगाळ किसन गावंडे, वाल्मिक अगीवले,बुधा गावंडे ,बुधा मेंगाळझिपा मधे, चिमा पोकळे यांनी माहिती दिली.




## सांगतो मी ऐका !

व्यथा निसर्गाची,
सांगतो मी ऐका!
स्वार्थी माणसाने,
कमविला पैका.

जंगल तोडून,
वसविली वस्ती.
निसर्गाशी आता,
खेळतोय कुस्ती.

स्वार्थी माणसाला,
आली हो लहर.
विनाश करूनी,
पाहतो कहर.
निसर्ग कोपता,
उडाले की झोप.
म्हणतोय आता,
बरी होती खोप.

म्हणून म्हणतो,
आता तरी जाग.
लागणार पुन्हा,
बुडाखाली आग.

निसर्गाचे आता,
करावे जतन.
नसता होईल,
सर्वांचे पतन.

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## प्रा. डॉ. सारिका विश्वाबंर जाधव यांना "पीएच्.डी. पदवी" प्रदान



**बीड (प्रतिनिधी) :** बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथिल कै.प्रल्हादराव जाधव यांची नात व श्री.विश्वाबंर अण्णा जाधव यांची कन्या प्रा. डॉ.सारीका जाधव .यांना शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजली जाणारी "पीएच्.डी.( विद्यावाचस्पती )ही पदवी.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्रदान केली आहे.त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर भूगोल विभागा अंतर्गत.“बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतूक जाळ्याचा भौगोलिक अभ्यास” या विषयावर जनविकास महाविद्यालय, बनसारोळा येथील भूगोल विभागाचे संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ.पिसाळ एस.जी.यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदिर्घ शंशोधन करून आपला शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता.त्यास विद्यापीठाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी मान्यता देवून त्यांना " पीएच्.डी."ही पदवी नुकतीच प्रदान केली आहे. या त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून कुटुंबीय, मित्रपरिवार व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्यांच्या या यशाबद्दल बंकट स्वामी संस्थान नेकनूर चे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे,ह.भ.प.नाना महाराज कदम,व साखरे बोरगांव येथिल अग्नीश्मन अधिकारी मा.शिवाजीराव झनझन, राम नाईकवाडे, विष्णु चव्हाण,सरपंच गजानन घरत,माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे ,पोलीस पाटील तुकाराम घरत,सखाराम घरत, प्रा.डॉ. अशोक देवगुडे,प्रा.श्रीकृष्ण झनझन, रजनीकांत जाधव, दिलीप जाधव, नाना जाधव,बंडू जाधव, संभाजी जोगदंड आदिनी अभिनंदन केले आहे.त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ एप्रिल २०२६


## महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या राज्य कार्यकारिणी अध्यक्षपदी दत्तात्रय कौटकर



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** बुलढाणा येथील जिजामाता महाविद्यालयाच्या सभागृहात सभा संपन्न झाली.महासंघाचे माजी अध्यक्ष दिवंगत ॲड.प्रा.व्हि.के.क्षीरसागर यांच्या १६ व्या स्मृती दिनाच्या औचित्याने आयोजित केलेल्या या सभेच्या अध्यक्षस्थान बैठकीत महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष मा. राजेंद्र कुमार खाजेकर साहेब तर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले केंद्रीय महासचिव मा. बापूसाहेब ससाणे साहेब, केंद्रीय मुख्य संगठन सचिव मा.विजय क्षीरसागर नियोजित केंद्रीय उपमहासचिव श्रीम.अस्मिता क्षीरसागर मॅडम, केंद्रीय कोषाध्यक्ष तुकाराम रोकडे,जेष्ठ उपाध्यक्ष निवृत्ती सरकटे, कास्ट्राईब राज्य पर्यवेक्षिका संघाच्या अध्यक्षा अंजली देशमुख यांच्या हस्ते या बैठकीत महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब आरोग्य कर्मचारी संघ या कास्ट्राईबच्या नव्या संघाची रचना करुन या संघाच्या राज्य अध्यक्ष पदी श्री दत्तात्रय साहेबराव कौटकर, (आरोग्य विभाग परभणी) यांची निवड करून नियुक्त आदेश देण्यात आले .या वेळी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे सर्व पदाधिकारी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागातून आलेले पदाधीकारी उपस्थित होते.

तसेच परभणी जिल्ह्यातील श्री विजयकुमार ढगे, (जिंतूर) श्री सुरेश जाधव (जिंतूर) व श्री विनोद येसके,(मानवत) हे ही आवर्जून उपस्थित होते. या निवडीबद्दल उपस्थित सर्वांनी व मित्रपरिवाराने कौटकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे नवीन इमारतीत स्थलांतर



**बीड (भगवंत पाळवदे) :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबाजोगाई हे कार्यालय आता स्वत:च्या मालकीच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. लातूर–छत्रपती संभाजीनगर महामार्गालगत, स्व. विमलताई मुंदडा आरोग्य संकुल, सेंजारी, मौजे लोखंडी सावरगाव येथे बांधण्यात आलेल्या नवीन कार्यालयीन इमारतीमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाईचे सर्व कामकाज दि. ०६ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.त्यामुळे वाहन नोंदणी, वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), परवाने, कर भरणा तसेच इतर सर्व परिवहन कार्यालयाशी संबंधित कामकाजासाठी नागरिकांनी यापुढे लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयात उपस्थित राहून आपली कामे करून घ्यावीत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई यांनी केले आहे. नवीन कार्यालयीन इमारतीमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून कामकाज अधिक सुलभ व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन पुढील सर्व कामकाजासाठी लोखंडी सावरगाव येथील नवीन कार्यालयाचा उपयोग करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# मुरूम येथे पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी कार्यशाळेचे उत्साहात उद्घाटन




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री. माधवराव पाटील महाविद्यालयात भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित दोन दिवसीय 'पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी कार्यशाळा महाअभियानाचे' नुकतेच थाटात उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बसवराज पाटील आणि धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पंडित दीनदयाल उपाध्याय आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना वैचारिक शिदोरी देण्यासाठी या विशेष निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या महाअभियानामागे प्रामुख्याने 'अंत्योदय' विचारांचा प्रसार करणे हा मुख्य उद्देश आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला एकात्म मानववाद आणि समाजातील शेवटच्या घटकाचा विकास हा विचार तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या कार्यशाळेचा उपयोग होत आहे. या माध्यमातून पक्ष संघटना केवळ वरच्या स्तरावरच नव्हे, तर थेट बूथ पातळीपर्यंत सक्रिय करण्यावर भर दिला जात आहे. नवीन कार्यकर्त्यांना पक्षाच्या कार्यपद्धतीची ओळख करून देणे आणि जुन्या कार्यकर्त्यांना पुन्हा जोमाने कामाला लावणे, हा या अभियानाचा एक महत्त्वाचा भाग आहे.राजकारणात केवळ निवडणूक जिंकणे हेच ध्येय न ठेवता, कार्यकर्त्यांना राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांची सखोल जाण असावी, यासाठी या कार्यशाळेत विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये वक्तृत्व कौशल्य, जनसंपर्क आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना सामान्य जनतेपर्यंत कशा पोहोचवायच्या, याचे मार्गदर्शन करण्यात येत आहे. विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.याप्रसंगी मार्गदर्शनासाठी उपस्थित असलेले धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी जनसंघ ते जनता पक्ष आणि आजचा भारतीय जनता पक्ष या प्रवासातील पक्षाची जडणघडण व प्राप्त झालेली सत्ता या विषयावर सविस्तर मांडणी केली. या उद्घाटन प्रसंगी लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, या अभियानाचे धाराशिव जिल्हा संयोजक दत्ता राजमाने, ॲड. अनिल काळे, मुरूमचे नगर उपाध्यक्ष रमेश चव्हाण, मुरूम मंडळ अध्यक्ष गणेश अंबर यांच्यासह मुरूम मंडळातील सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दोन दिवस चालणाऱ्या या निवासी शिबिरामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे. या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा उल्हास घुरघुरे यांनी केले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ एप्रिल २०२६


## रायलसिमा परभणी पर्यंत वाढवा खा. संजय जाधव यांनी केली रेल्वे मंत्र्याकडे मागणी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** बहूचर्चित निझामाबाद तिरुपती ही रेल्वे परभणी पर्यंत करण्याच्या बालाजी भक्तांच्या मागणीला परभणी चे खासदार संजय जाधव यांनी दाद देत आज रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांच्या कडे लेखी पत्र देऊन मागणी केली आहे .गेल्या अनेक वर्षा पासून च्या बालाजी भक्तांच्या मागणी साठी आज परभणी चे खासदार संजय जाधव यांनी दाद देत निझामबाद-तिरुपती सुपर फास्ट रेल्वे गाडीला परभणी येथून सोडण्यात यावी अशी मागणी त्यांनी आज रेल्वे मंत्री यांच्या कडे केली आहे सोबत अनेक मागण्याचे निवेदन ही त्यांनी दिले तिरुपती येथील बालाजी भक्तांना परभणीतून दररोज रेल्वे नसल्याने अनेक समस्या त्रास सहन करीत निझामाबाद येथून बदलून पुढे जावे लागते वेळेचा मोठा अपव्यय आणि गर्दी मुळे आरक्षण न मिळणे आदी प्रश्न उपस्थित होतात नांदेड च्या हक्काची देवगिरी एक्सप्रेस लिंगम्पल्ली कडे वाढवली पण रायलसीमा एक्सप्रेस मात्र परभणी पर्यंत वाढून बालाजी भक्तांच्या अडचणी दूर करव्यात असे खा जाधव यांनी रेल्वे मंत्री यांच्या कडे स्पस्ट केले मरावाड्यातील खासदार यांचं या बाबत लक्ष वेधण्यासाठी शेकडो बालाजी भक्तांनी SMS करुंन मागणी केल्याने उर्वरित खासदार लवकरच रेल्वे मंत्री यांना भेटून पत्र देतील अशी माहिती भाजप व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कोकडवार यांनी दिली आहे.

## उमरगा जनता बँकेने आरबीआयच्या निकषांचे पालन करुन सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केला आहे.

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा जनता बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करुन सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँककडे २४२ कोटींच्या ठेवी असुन १६१ कोटीचे कर्ज वाटप केले आहे. बँककडे ९ कोटी २३ लाखाचे भागभांडवल असून तर राखीव निधी २३ कोटी आहे. बँकेचे खेळते भांडवल २८६ कोटी, गुंतवणूक ८२ कोटी असुन संपलेल्या आर्थिक वर्षात ५ कोटीचा नफा मिळाल्याची माहिती बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील यांनी दिली. लोकनेते बसवराजजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुरावजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा जनता बँक यशाची शिखरे पादाक्रांत करीत आहे. उमरगा जनता सहकारी बँकेने अल्पावधीतच उत्तुंग भरारी घेतली आहे. झपाट्याने प्रगती करत असलेली व तत्पर सेवा देणारी बँक म्हणून आज उमरगा जनता बँककडे पाहिले जाते. बँकेने खातेदारांच्या सोईकरिता सोने तारण कर्ज, सोलार कर्ज, वाहन कर्ज, गृह कर्ज, व्यवसाय कर्ज, सुवर्ण अलंकार कर्ज व सौर गृह प्रकाश योजना, मराठा तरुणांना व्यवसायासाठी आण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत कर्ज माफक व्याजदराने वाटप करण्यात येत आहे. बँककडे क्यू आर. कोड, आय. एम. पी. एस., नॅच आदी सुविधा सुरू असुन युपीआय सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात बँककडे २४२ कोटींच्या ठेवी असुन सभासदांना १६१ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. खेळते भांडवल २८६ कोटी, गुंतवणूक ८२ कोटी असुन बँकेचा स्वनिधी मध्ये देखील चांगली वाढ होऊन स्वनिधी रु. ३२.२२ कोटी झाला असुन बँकेला चालू आर्थिक वर्षात ४.५५ कोटी रुपये ढोबळ नफा झाला आहे. सभासदांच्या सहकार्याने बँकेचे नेट एन. पी. ए. केवळ १.६९ टक्के राखण्यात यश संपादन केले आहे.बँकेच्या ठेवीमध्ये सातत्याने वाढ होत असून हे ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक आहे. बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन केले असून बँकेने सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केलेला आहे. बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेची नवीन शाखा लातूर येथे चालू केली आहे. बँकेच्या उमरगा, मुरुम, जेवळी, कासारशिरसी, जळकोट, सोलापूर व लातुर येथे शाखा आहेत. बँककडे एस एम एस, आरटीजीएस, एन ई एफ टी, कोअर बँकिंग सुविधा उपलब्ध आहेत.

पुढील वर्षात सर्व सभासद, खातेदार, हितचिंतक यांच्या सहकार्याने बँकेचा एनपीए ० टक्केवर आणण्याची आशा व्यक्त करुन ग्राहकांचा बँकेवर असणारा विश्वास यामुळे बँकेने ठेवी मध्ये मोठी झेप घेतल्याचे चेअरमन पाटील यांनी सांगितले.

## गॅस सिलेंडर

या सिलेंडरने बाबा, जगणे मुश्किल केले
या गॅस सिलेंडरने जगणे हमालीचे केले...

कामधंदे सोडून लोक सिलेंडरमागे पळे
दिवस-दिवस बसून तो गॅस सिलेंडर मिळे...
या गॅस सिलेंडरला दिवस सोन्याचे आले
काय दिवस आले, जगणे हमालीचे झाले...

या सिलेंडरने बाबा, जगणे मुश्किल केले
या गॅस सिलेंडरने जगणे हमालीचे केले...

ज्यांची बुकिंग नाही, त्यांना सिलेंडर नाही
डी.ए.सी.नंबर घेऊन ऑफिसला यावे...
पावती तुमची तुम्ही घेऊन जा, सांगे...

या सिलेंडरने बाबा, जगणे मुश्किल केले
या गॅस सिलेंडरने जगणे हमालीचे केले...

आठ दिवसांनी तारीख त्याची मिळे
आठ दिवसांनी गोडावूनला जाऊन
सिलेंडर तुमचा तुम्ही घेऊन जाणे...
बारीला नंबर लावा...
तुमची नोंदणी पावती दावा...
इकडे पैसे भरा...
तिकडे रिकामा सिलेंडर ठेवा..
तिथून उचला तुमचा सिलेंडर नवा...
गॅस एजन्सीचा रुबाब राजावाणी,
खुर्चीवरुन देई आदेश मंत्र्यावाणी...

या सिलेंडरने बाबा, जगणे मुश्किल केले
या गॅस सिलेंडरने जगणे हमालीचे केले...
घरपोच सिलेंडरचे आज दिवस हरवले...
या सिलेंडरसाठी याआधी पाय नाही धावले...
भरलेला सिलेंडर घेताना...
वाटे गड जिंकल्यावाणी...

रोज उठल्या-पडल्याची
लागली कटकट मागे ...

सिलेंडरचा आता बायका औक्षण करी ,
नवरोबाला सोडून आता
बायका सिलेंडरवर प्रेम करी...

सिलेंडर आणा, तरच घरात एन्ट्री देईल...
बायकाही आता नवऱ्याला दम देई...
या सिलेंडरसाठी आता दांड्या कामाला...

या सिलेंडरने बाबा, जगणे मुश्किल केले
या गॅस सिलेंडरने जगणे हमालीचे केले...

**- लक्ष्मण वाल्डे**


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**


**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ एप्रिल २०२६


# नागसेन फेस्टिव्हलचा जल्लोषात समारोप









**पी**पल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या वतीने भीमजयंती निमित्ताने मिलिंद महाविद्यालय, नागसेनवन परिसरात दि. २९, ३० आणि ३१ मार्च अशा ३ दिवसीय 'नागसेन फेस्टिव्हल'चा मंगळवार दि. ३१ रोजी जल्लोषात समारोप करण्यात आला. तीनही दिवस हजारो नागरिकांची या महोत्सवास उपस्थिती होती.दि. २९ रोजी कन्नड चित्रपट अभिनेते चेतन कुमार अहिंसा यांच्या हस्ते या महोत्सवाचे भव्य उद्धाटन करण्यात आले.यावेळी आपल्या भाषणात बोलताना युवकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष समजून घ्यावा, त्याशिवाय परिस्थितीशी कसे लढायचे हे आपणांस समजू शकणार नाही, असे प्रतिपादन केले. शिवाय तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याला भटकवले जात आहे. आपले मूळ विषय बाजूला जाऊन आपल्याला प्रतिक्रियावादी ठरविण्यात मनुवादी असुरी आनंद घेत आहेत, मात्र आता मार्ग शोधण्यासाठी बाबासाहेबांचा संघर्ष आणि विचार आपल्याकडे आहेत. त्यामुळे आपल्या कर्तव्याचा विसर पडू न देता सातत्यपूर्ण संघर्ष सुरू ठेवावा, असे प्रतिपादन केले.यावेळी ज्येष्ठ पत्रकार उर्मिलेश यांनी 'बहुजनांच्या शैक्षणिक नाकेबंदीचे राष्ट्रीय षडयंत्र' या विषयावर सखोल विवेचन करताना नवीन शैक्षणिक धोरणाची चिरफाड केली. हे शैक्षणिक धोरण नसून मनुवाद रुजविण्यासाठी केलेली रीतसर खेळी आहे, असा घणाघात केला. कौशल्य विकासाच्या नावाखाली जातिआधारित व्यावसायिक शिक्षण आणून भेदभावाचे षडयंत्र रचले जात आहे, असे प्रतिपादन करत शिक्षणाला मौलिक अधिकार म्हणून स्थान असावे, हा बाबासाहेबांचा आग्रह होता. मात्र त्यासाठी अनेक वर्षांनंतर न्यायालयातून निकाल यावा लागला, हे या देशाचे दुर्दैव आहे, असे टीकास्त्र सोडले. बहुजनांचे शिक्षण धोक्यात आणण्यासाठी, उच्च शिक्षणापासून परावृत्त करण्याचा डाव रचला जात आहे, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची माणसे हा डाव यशस्वी होऊ देत नाहीत. त्यामुळेच अनेक नेते हायजॅक करून हा लढा कुठेतरी अडवून ठेवायचा डाव आपण हाणून पाडावा, असे आवाहन केले.मंचावर व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव, प्राचार्य सुनील वाकेकर, प्राचार्य धन्यकुमार टिळक, युवा कवी बच्चा लाल उन्मेष यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी चेतन कुमार अहिंसा यांच्या हस्ते व्यंगचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्धाटन करण्यात आले. कार्टूनिस्ट कंबाईन आणि मिलिंद नागसेनवन स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने सुमारे ४८ चित्रकारांची १५० हून अधिक चित्रे प्रदर्शनात ठेवण्यात आली होती.लोकशाही, गॅस टंचाई, माध्यमांची मुस्कटदाबी, सोशल मीडियाचे व्यसन, शिक्षण क्षेत्राची भांडवली व्यवस्था, मराठी शाळांची दुरवस्था असे अनेक चित्रांनी उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले.नितीन गायकवाड आणि संचाने शास्त्रीय गायनातून 'भीमस्मरण' सादर केले, मिलिंद हायस्कूलच्या विद्यार्थिनी आणि प्रांजल सुरडकर यांनी अभिवादनपर नृत्य सादर केले.रायफल शूटिंग प्रशिक्षक सुंदर घाटे, केंब्रिज विद्यापीठाचे संशोधक विद्यार्थी अभिजित वाघरे, डॉ. आनंद भुक्तर यांना मिलिंद सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.सूत्रसंचालन सचिन निकम, प्रास्ताविक सिद्धार्थ मोकळे तर आभार हेमंत मोरे यांनी केले.■ महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी एल्गार समतेचा हे कविसंमेलन पार पडले. यात बच्चा लाल उन्मेष हे अध्यक्षस्थानी होते, तर डॉ. अभिजित खांडकर, उमेश खोब्रागडे आणि दोन्ही पायांनी दिव्यांग असलेले गझलकार गणेश खरात यांचा सहभाग होता.एकवेळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने सुभेदार रामजी आंबेडकर सभागृहात पुढील कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले.बच्चा लाल उन्मेष यांची बहुचर्चित 'कौन जात हो भाई' या कवितेसोबतच 'हमे जमीन चाहिए, सारा आसमान तुम रख लो; हमे संविधान चाहिए, गीता कुरान तुम रख लो' ही खास शैलीत सादर केलेली कविता विशेष दाद मिळवून गेली, तर गणेश खरात यांची 'माणसांना माणसाचा त्रास आहे गौतमा, चेहऱ्यावर कारुण्याचा भास आहे गौतमा' ही गझल सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.तर खोटाच वाचला हो इतिहास काल ज्यांनी, त्यांचाच पोरगाही शाळेत पास झाला, अशी मांडणी करून शैक्षणिक क्षेत्रातील जात वास्तवावर प्रहार केला. तर पुढे झेंडेच उंच केले सज्ञान माणसांनी, मूर्तीत बुद्ध माझा तेव्हा उदास झाला या ओळींनी आत्मचिंतनास भाग पाडले.डॉ. अभिजित खांडकर यांची मारोती कांबळेचे काय झाले ही हिंदी अनुवादित कविता सादर केली.गिरीश खोब्रागडे यांची आपला पाडाव करण्याचे जमेना म्हणून ते इथे रचतात म्हणून कट नव्याने, जाहलो नाहीच जर आताच सावध, ओढवू शकते पुढे संकट नव्याने ही रचना सादर करून संघर्षाची गरज अधोरेखित केली.दुसऱ्या सत्रात'नव माध्यमातील आंबेडकरी पत्रकारितेचे वर्तमान आणि भविष्य' या विषयावर सुमित चव्हाण, दिल्ली, साहिल वाल्मिकी, नोएडा, हितेश कुमार, हाथरस (उत्तर प्रदेश), मनीष सागर, मनाली, तर ठाणे येथील राज आसरोडकर यांनी डिजिटल माध्यम आणि आंबेडकरी पत्रकारितेच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. यातील दिल्ली येथील सुमित चव्हाण यांनी माध्यमातील भांडवलशाही देशाचे मोठे नुकसान करत आहे, सत्य लपविण्यासाठी फेक नॅरेटिव्ह सेट केले जातात. ही मेनस्ट्रीम मीडिया नसून मनुस्ट्रीम मीडिया आहे, असा घणाघात केला. तसेच आता डिजिटल माध्यमातून कमी संसाधने वापरून प्रामाणिक पत्रकारितेला जागा निर्माण झाली आहे. डिजिटल माध्यमे ही ८० टक्के वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी हक्काची मीडिया आहे, लोकांनी साथ देणे गरजेचे आहे, असे आवाहन केले.साहिल वाल्मिकी यांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे संदर्भ देत त्यावेळेसारखी परिस्थिती आज नसतानाही लोक सत्य बोलायला घाबरतात. माध्यमांची मालकी असलेले लोक आपले इतर व्यवसाय भागीदारी टिकवण्यासाठी माध्यमांचा वापर करतात, हे धोकादायक आहे. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला धोका झाल्यास भांडवलशाही वर्गाची गुलामगिरी आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा अधिकाधिक वापर करून आपले प्रश्न तडीस न्या, असे प्रतिपादन केले.राज आसरोडकर, हितेश कुमार यांनी डिजिटल माध्यमाचे महत्त्व सांगितले. सर्वसामान्यांना न्याय देण्याची शक्ती पत्रकाराच्या हातात आहे, तिचा योग्य वापर करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.यानंतर पाराई वादन करून आडवी आर्टने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. तामिळ भाषेत गुलामगिरी संपवून टाकायची आहे, समता आणण्यासाठी लढावे लागेल, असे मांडले.साहित्यिक डॉ. सतीश म्हस्के, डॉ. महेंद्र गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सचिन डोंगरे यांना मिलिंद सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.सूत्रसंचालन सिद्धार्थ मोकळे, प्रास्ताविक सचिन निकम तर आभार रत्नदीप रगडे यांनी केले.■ सांगतामहोत्सवाच्या समारोपाला रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते, सफाई कर्मचारी आंदोलनाचे राष्ट्रीय संयोजक बेझवाडा व्हील्सन यांनी स्वातंत्र्यानंतर देशात आजही अनेक जिल्ह्यांत महिलांना हाताने मैला साफ करावा लागतो, ही देशासाठी लाजिरवाणी बाब आहे, असे सांगितले. स्वच्छ भारतासारखे अनेक उपक्रम आले तरीही हाताने मैला साफ करण्याची प्रथा बंद झालेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.ते तंत्रज्ञानाचा बुरखा, मॅन्युअल स्कॅव्हेंजिंगचा चेहरा : भारताचं जात वास्तव या विषयावर भाष्य करत होते.स्वातंत्र्यानंतर देशात आजही अनेक जिल्ह्यांत महिलांना हाताने मैला साफ करावा लागतो, ही देशासाठी लाजिरवाणी बाब आहे. स्वच्छ भारतासारखे अनेक उपक्रम आले तरीही हाताने मैला साफ करण्याची प्रथा बंद झालेली नाही, अशी खंत मॅगसेसे पुरस्कार प्राप्त सफाई कर्मचारी आंदोलनाचे राष्ट्रीय संयोजक बेजवाडा विल्सन यांनी व्यक्त केली.उल्लेखनीय काम करणाऱ्या बुद्ध विहार समित्यांपैकीसाकेत बुद्ध विहार, साकेत नगर, तक्षशिला बुद्ध विहार, संजय नगर, धम्मसेवा संघ बुद्ध विहार, जयभवानी नगर, त्रिरत्न बुद्ध विहार, माऊली नगर, बोधिसत्व बुद्ध विहार, संघरत्न बुद्ध विहार, मयूर पार्क, पद्मपाणी बुद्ध विहार, बजाज नगर, कपिलवस्तू बुद्ध विहार, उस्मानपुरा, शाक्यपुत्र बुद्ध विहार, भोईवाडा यांच्या पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला.'जल्लोष भीमजयंतीचा' या विशेष सत्रात प्रांजल सूरडकर, रिदम रिव्होल्युशन संघाच्या पथकाने, विपीन तातड आणि टीम यांनी रंगतदार सादरीकरण केले. मेघानंद जाधव, अरहं वाळके यांनी भीमगीते सादर केली.पंजाबराव मोरे यांनी संविधान पोवाडा गाऊन जल्लोष भरला तर विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या चित्रकार नंदकुमार जोगदंड, बिन छताची शाळा चे भगवान सदावर्ते, लेणी अभ्यासक सूरज जगताप, ऍड. महेश भोसले, दामा फाउंडेशन यांचा सन्मान करण्यात आला.नृत्य दिग्दर्शक उत्कर्षा बोरीकर, राज्यपाल गवई, राहुल अंकुशे, उमेश चाबुकस्वार यांचा नृत्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याच्या कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

दशकपूर्ती महोत्सवदशकपूर्ती नागसेन महोत्सवाच्या या सांगता समारंभात चित्रपट अभिनेते प्रविण डाळिंबकर, भीमराव सरवदे, ॲड. अमोल सावंत, चित्रकार संजीव सोनपिंपरे, प्राचार्य टी. ए. कदम, माजी प्राचार्य यु एल जगताप, के एम बनकर यांनी मार्गदर्शन केले.महोत्सवात तीनही दिवस युजीसी इक्विटी बिलाला दिलेली स्थगिती, महाबोधी विहाराचा तिढा आणि अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण यावर सुमारे ४२०० नागरिकांनी आक्षेप नोंदवत स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदविला.महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सचिन निकम, हेमंत मोरे, सिद्धार्थ मोकळे, ऍड. सुनील मगरे, प्रा. मिलिंद मनवर, प्रा. के एम बनकर, ऍड. अनिल वरठे, मेघानंद जाधव, प्रा. प्रबोधन बनसोडे, कुणाल भालेराव, प्रसेनजीत गायकवाड, राष्ट्रपाल गवई, सुमित सुरडकर, सागर गायकवाड, चिरंजीव मनवर, सागर ठाकूर, ब्रिजेश इंगळे, अतुल चव्हाण, किरण मगरे, रत्नदीप रगडे, सुमेध नरवडे, मंथन गजहंस, जय कांबळे, सम्यक त्रिभुवन आदींनी परिश्रम घेतले.